# शेतकरी संघटक

वर्ष १२ वे
अंक ३ रा
६ जून १९९५
पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. ३०
किंमत १ रुपया २५ पैसे


## देशातील आर्थिक समस्या पडद्याआड

लोकसभेची निवडणूक जसजशी जवळ येत चालली आहे तसतशा देशाच्या राजकीय आघाडीवर जोरदार हालचाली सुरू होत आहेत. विरोधी पक्षांचे डोळे दिल्लीच्या सिंहासनाकडे लागले आहेत. सत्तारूढ काँग्रेसमधील सत्तातुरांचाही एकमेकांचे पाय ओढण्याचा खेळ सुरू झाला आहे. पण देशातील आर्थिक परिस्थितीबाबत कोणी बोलायला तयार नाही.

दिल्लीवर डोळा ठेऊन असलेल्या विरोधी पक्षातील काही २ रु. किलो तांदुळाच्या गोष्टी बोलतात, कोणी १ रुपयात झुणका भाकर वाढतात. पण, हे करणारे उत्पादक शेतकऱ्याला भाताची, ज्वारीची किंवा हरभऱ्याची किती किंमत देणार याबाबत 'ब्र'ही काढत नाहीत.

शेतीचा हंगाम सुरू होत आहे. पावसाचे अनुमान वर्तवले जात आहे. पण, दरवर्षी देशातील शेतकऱ्यांना २४००० कोटी रुपयांना आम्ही लुटतो असा लेखी कबुली-जबाब देणारे सरकार शेतीउत्पादनांच्या बाबतीत काय धोरण ठेवणार याबद्दल काही बोलत नाही. अजूनही निर्यातीवरील बंदी, देशातील भाव कमी ठेवण्यासाठी निकृष्ट आयात, त्यामध्ये भ्रष्टाचार यांचे चक्र चालूच आहे. शेतीमालांसाठी आधारभूत किंमतीचीच पद्धती चालू ठेवण्याचा सरकारचा विचार असेल, स्वीकृत खुल्या व्यवस्थेच्या तत्त्वांशी विसंगत असले तरी, तर येत्या हंगामासाठी आधारभाव याआधीच जाहिर व्हायला हवे होते. पण, सरकारला खुर्च्यांच्या स्पर्धेत फुरसत मिळत नाही असे दिसते.

नाबार्डसारखी बँक शासनाने कर्जमाफीच्या योजनेचा फेरविचार करावा असे म्हणते. पण, शेतीसारखा जो धंदा कायम बुडितच राहातो (कारण तो तसा राहावा हे सरकारी धोरण आहे.) त्या धंद्यासाठी कर्ज वाटण्याची सक्ती करू नये अशा बँकिंगच्या तत्त्वाशी सुसंगत मागणी करत नाही. उलट, राष्ट्रीकृत बँकांनी ग्रामीण भागाचा पतपुरवठा वाढवावा अशी आग्रही सूचना रिझर्व बँक करते.

जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक व्यापार संघटना (WTO) म्हणजे या आधीची GATT संस्था शेती निर्बंधमुक्त करा असे म्हणते तर केंद्र शासन मळीची विक्री व वाहतूक यांवरील उठविलेले निर्बंध पुन्हा लादण्याचा विचार करीत आहे.

एकूण, देशातील आर्थिक स्थिती खालावत चालली आहे. राजकीय सत्तेच्या लठ्ठालठ्ठीत तिकडे लक्ष द्यायला कोणाला फुरसत दिसत नाही.

देशावरील परकीय कर्जावरील व्याजाचा बोजा वाढू लागला आहे. व्यापारी तूट ही वाढू लागली आहे.

आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचा खराखुरा कणा असलेला उत्पादक शेतकरी, उद्योजक, व्यावसायिक या सर्व परिस्थितीबाबत कमालीचा उदासीन आहे.

दोन रुपये किलोने तांदूळ विकता?
विका.
एक रुपयात झुणका-भाकर देता?
द्या.
त्यासाठी आमच्या माना कापायच्यात?
कापा.

**इंडियाच्या परदेश व्यापाराचा ताळेबंद १९९२-१९९५**
**कोटी (अमेरिकन) डॉलर्स**

| | निर्यात | आयात | व्यापारी तूट |
|---|---|---|---|
| १९९२-९३ | १८४२ | २१७३ | ३३१ |
| १९९३-९४ | २२१७ | २३२१ | १०४ |
| १९९४-९५ | २६२२ | २८२५ | २०३ |

टाईम्स् ऑफ इंडिया, ८ मे १९९५

# स्वतंत्र भारत पक्षाला मतदारांनी का नाकारले ?

फेब्रुवारी १९९५ मध्ये पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर वरील प्रश्न 'शेतकरी संघटक'च्या वाचकांपुढे ठेवला होता. त्याला प्रतिसाद म्हणून दोन अडीचशे पत्रे संघटकच्या कार्यालयाकडे आली. त्यातील काही पत्रे जशीच्या तशी मागील दोन (२१ एप्रिल १९९५, २१ मे १९९५) अंकांतून प्रकाशित करण्यात आली आहेत.

शरद जोशी जरी म्हणत असले की 'लोकांच्या निवडीला दोष देणे गैर आहे' (शेतकरी संघटक - २१ मे १९९५) तरी बहुसंख्य पत्रलेखकांनी १०,००० रुपयांची कर्जमाफी, शेतीमालाचे वाढीव भाव, कापूस सीमापार आंदोलनातील फायदा इत्यादींचे उल्लेख करून मते न देणाऱ्या शेतकऱ्यांना कृतघ्न ठरविले आहे. पण 'का नाकारले' या प्रश्नाला 'नाकारले' या क्रियापदाच्या अनुषंगाने कोणाही पत्रलेखकाच्या पत्रात उत्तर सापडत नाही. याचे कारण नाशिकचे डॉ. गिरीधर पाटील म्हणतात तेच असावे. ते म्हणतात, 'स्वतंत्र भारत पक्षाला मतदारांनी नाकारले हा प्रश्न थोडा वेगळ्या तऱ्हेने मांडता येईल. खरं म्हणजे 'नकार' तेव्हा समजता येईल की स्वतंत्र भारताचा विचार-भूमिका-जाहिरनामा सर्व मतदारांपर्यंत 'समजेल' अशा माध्यमातून गेला, मतदारांनी तो समजावून घेतला आणि नंतर 'नाकारले' तर तो नकार आपण समजू शकतो.' (शेतकरी संघटक - २१ मे १९९५)

येथे इतर काही पत्रलेखकांच्या पत्रातील काही मुद्दे प्रकाशित करीत आहे.

जिल्ह्याजिल्ह्यात स्वतंत्र भारत पक्षाच्या बांधणीचे काम सुरू झाले आहे. स्वतंत्र भारत पक्षाचे महासचिव श्री. एस्. व्ही. राजू, स्वतंत्र भारत पक्षाचे महाराष्ट्राचे निमंत्रक ॲड. मोरेश्वर टेमुर्डे, ॲड. वामनराव चटप (आमदार) व इतर कार्यकर्त्यांनी एप्रिलमध्ये नागपूर, लातूर, इस्लामपूर व नाशिक येथे विभागीय बैठका घेऊन बांधणीच्या कामाची कार्यकर्त्यांना कल्पना दिली.

येत्या लोकसभा निवडणुकीपर्यंत पक्षाचा जाहिरनामा मतदारांपर्यंत, 'समजेल' अशा माध्यमातून पोहोचविण्याइतपत यंत्रणा उभी करणारी पक्षाची बांधणी करण्यात पक्षाचे कार्यकर्ते यशस्वी होवोत आणि त्या निवडणुकीत पक्षाला महाराष्ट्रात घवघवीत यश मिळो ही सदिच्छा.

**- सुरेशचंद्र म्हात्रे**

---

१) **गोपीदास गेडेकर, गडचिरोली** : ★ शरद जोशी हे काही केवळ प्रांतिक नेते नाहीत; त्यांनी किरकोळ निवडणुकीस उभे न राहता राजकीय चळवळ उभी करण्याच्या दृष्टीने कार्यरत राहणे मतदारांना अभिप्रेत होते. ★ शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांचा सर्वसामान्यांशी संपर्क राहिलेला नाही. त्यामुळे निवडणुकीच्या संदर्भात लोक त्यांच्याकडे इतर पक्षांच्या कार्यकर्त्यांप्रमाणेच पाहतात. ★ इतर पक्षांप्रमाणे इथेही बंडखोरी किंवा स्वतःच्याच उमेदवारांविरूद्ध प्रचाराचे प्रकार झाले.

२) **सीताराम मोरे, जांब (बु.), (नांदेड)** : निवडणुकीसाठी खास प्रचार, यंत्रणेचा अभाव; तरुण वर्गाला इतर पक्षांच्या फसव्या आश्वासनांच्या गुंत्यातून बाहेर काढणे जमले नाही, आचार संहितेला न जुमानता इतर पक्षांकडून पैसे वाटप, स्वतंत्र भारत पक्षाची बांधणी कमकुवत.

३) **बी. डी. देशमुख, उजळंब (लातूर)** : काँग्रेसला पाडायचे म्हणून लोकांनी जातीयवाद्यांना मते दिली, स्वतंत्र भारत पक्षाला मते दिली तर ती, त्याचे उमेदवार निवडून न आल्याने फुकट जातील अशी भीती वाटली.

४) **गणपती सरोदे, नरखेड, (नागपूर)** : म. गांधीजींच्या परिश्रमाने मिळालेल्या स्वातंत्र्याची फळे लबाड नेहरूवाद्यांनी लाटली, सामान्यांपर्यंत जाऊ दिली नाहीत. तद्वतच, गेल्या पंधरा वर्षात शेतकरी संघटनेने आंदोलने करून तयार झालेल्या काँग्रेसविरोधी हवेचा लाभ इतर पक्षांनी घेतला. प्रभावी प्रसार साधनांच्या – उदाहरणार्थ दैनिक वर्तमान, आकाशवाणी, दूरदर्शन यांच्या अभावामुळे स्वतंत्र भारत पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली नाहीत.

५) **डॉ. हसनराव देशमुख, तरडखेड (बुलढाणा)** : ★ संघटनेची राजकीय बांधणीच झालेली नाही. ★ शहरी मतदारांमध्ये संघटनेबद्दल आपुलकी नाही. ★ स्वतंत्र भारत पक्षाची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यास पुरेसा वेळ मिळाला नाही.

६) **मु. ग. लोखंडे, आमोदे (जळगाव)** : ★ कार्यकर्त्यांत जिद्द शिल्लक राहिलेली नाही. ★ शेतकरी क्षुल्लक समस्येच्या तात्पुरत्या सोडवणुकीत संतुष्ट होतो, त्याला दूरगामी विचार करण्याची कुवत अजून आलेली नाही.

७) **महादेव गोविंद ढवरे, माणिक वाडा, (यवतमाळ)** : 'त्रिशंकू परिस्थिती' संबंधी वर्तमानपत्रांतून शरद जोशींच्या कथित निवेदनाला जी प्रसिद्धी मिळाली त्याने निर्माण झालेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यास कार्यकर्ते असमर्थ ठरले. लोकांना काँग्रेस नको होती. शेतकऱ्यांनी शरद जोशींचा

जातीयवादाविरूद्धचा सल्ला धुडकावला.

८) **मायानंद सोनवणे, कलमाडी (धुळे)** : राजकारणात उतरायला उशीर झाला. पक्षाला राष्ट्रीय मान्यता नसल्याने स्वतंत्र चिन्ह नव्हते, त्यामुळे जाहिरनामा असून सुद्धा स्वतंत्र भारतच्या उमेदवारांना मतदारांनी इतर अपक्ष उमेदवारांसारखेच लेखले.

९) **अनिल महाजन, नारसिंगी (नागपूर)** : संघटना ही अंतर्गत राजकारणामुळे पोखरली गेली आहे. कार्यकर्त्यांत एकवाक्यता नाही.

१०) **बबनराव चेके, वाकी ॥बु॥ (बुलढाणा)** : गेली पंचेचाळीस वर्षे चालत आलेल्या निवडणूक प्रक्रियेप्रमाणे निवडून येण्यासाठी इतर पक्षांच्या उमेदवारांना जे काही करावे लागले ते आपले उमेदवार करू शकले नाहीत.

११) **शिवहरी नागरे, राहेरी (खु.) (बुलढाणा)** : ★ जातीधर्माचे पसरलेले विष. ★ पक्षाची आर्थिक बाजू कमकुवत. ★ पक्षास मान्यता नसणे.

१२) **इंदरचंद बैद, खैरी (यवतमाळ)** : ★ श्री. शरद जोशींच्या सभा शहरी भागात झाल्या, ग्रामीण भागात विशेष नाही. त्यामुळे स्वतंत्र भारत पक्षाला शेतकऱ्यांच्या संभवनीय मतांमध्ये घट. ★ गावातील शेतमजूर, शहरातील नोकरवर्ग – सरकारी व निमसरकारी, सर्व राजकीय पक्षांचे पुढारी, पत्रकार या सगळ्या मंडळींचा विरोध.

१३) **केरूबा शिनगारे, उमरद, (बुलढाणा)** : अजूनही जातीच्याच माणसाला मतदान करण्याची प्रवृत्ती आहे.

१४) **रामहरी डांगोरे, पारडसिंगी (नागपूर)** : नेहरू नीतीमुळे देश बुडतो आहे हे सत्य लोक स्वीकारायला तयार आहेत पण पुतळे, फोटो काढून ठेवण्याची मानसिकता नाही. तसेच, जातीयवादी भाजप-शिवसेना जातीयवादी असली तरी कट्टर मुस्लिमविरोधी आहेत, त्यामुळे त्यांच्यावरील टीकाही त्यांना पटली नाही.

१५) **सु. दौ. देशमुख, अंमळनेर (जळगाव)** : पक्षाने अगदी ऐन वेळी निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला.

१६) **राजेंद्र लडके, अंजनगाव (चंद्रपूर)** : शेतकरी संघटनेच्या पूर्वाश्रमीच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी शेतकरी संघटनेच्या केंद्रीय नेतृत्वाला केलेले आव्हान.

१७) **रमाकांत महाले, अकोला (विदर्भ)** : स्वतंत्र भारत पक्षाचा जाहिरनामा व शेतकरी संघटनेबद्दल लोकांच्या मनात आदर आहे. पण शेतकरी संघटनेचे ८१/८२ मधील कार्यकर्ते निवडणुकीच्या काळात सर्व राष्ट्रीय पक्षांमध्ये विखुरलेले होते. स्वतंत्र भारत पक्षाचा निःशासनीकरणाचा मुद्दा आणि निवडणुकीतील सहभाग यांची जुळणी मतदारांच्या मनांत होऊ शकली नाही.

१८) **सुधाकर देशमुख, वळसंगी (लातूर)** : आपले उमेदवार 'कर्जमुक्ती' उमेदवार, म्हणून लेखाजोखाचे फॉर्म करण्यापुरते लोक बिल्ले लावून पुढे आले. आंदोलनातून मिळणारा फायदा, मिळाला तर लोकांना हवा आहे, पण व्यवस्था परिवर्तन वगैरे गोष्टी कळण्याची त्यांच्यामध्ये कुवत नाही.

१९) **राहूल म्हस्के, पुणे** : स्वतंत्र भारताची निवडणूक यंत्रणा उमेदवारांच्या मोठ्या संख्येमुळे एकाग्र होऊ शकली नाही. निवडक उमेदवार रिंगणात असते तर फरक पडला असता.

२०) **बबन देशमुख, दर्यापूर (अमरावती)** : सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या नेहमीच्याच लुटूपुटीच्या लढाईत दंग होऊन मतदार फसले. त्या गुंगीतून त्यांना बाहेर काढण्यात आपल्याला यश आले नाही.

२१) **सुभाष नाकतोडे, वडगांव राजदी (अमरावती)** : निवडणूक तिकीटांच्या वादात शेतकरी संघटनेचे (नाराज) कार्यकर्तेही पक्षविरोधात काम करू लागले. परिणामतः, मतदारांत संभ्रम निर्माण झाला.

२२) **रामदास लगड, कोळगाव (अहमदनगर)** : अजूनही सहकार सम्राटांच्या दडपणाखाली समाज आहे. पैसे वाटले, ना वाटले तरी त्या दडपणातून सुटण्याचे त्याचे धारिष्ट्य नाही.

२३) **एम्. पी. सोनवणे : चांदा (अहमदनगर)** : काँग्रेसला विटलेल्या जनतेला आपल्याकडे खेचून घेण्यात कार्यकर्ते असमर्थ ठरले. आणि त्याचे प्रमुख कारण म्हणजे साधनांची वानवा.

२४) **बजरंग बांगर, पिंपळगांव (पुणे)** : 'भीक नको हवे, घामाचे दाम' मध्ये बदल होऊन 'भीक नको, घेऊ घामाचे दाम' अशी घोषणा झाली. पण त्या बदलाइतकेसुद्धा कार्यकर्ते आक्रमक बनले नाहीत.

२५) **ॲड. प्रकाश पाटील, चोपडा (जळगाव)** : शेतकरी संघटनेची चळवळ सुरू झाली ती मुळातच अराजकीय संघटना म्हणून. "आम्हाला राजकारणात स्वारस्य नाही, राजकारणाशी संघटनेचा काही संबंध नाही" वगैरे सारख्या गेल्या १५ वर्षांतील वाक्यांनी सामान्य माणसांवर प्रभाव पाडला. त्यामुळे, ज्यांना राजकारणात स्वारस्य नव्हते परंतु देशासाठी काहीतरी करण्याची उर्मी होती अशीच, आपल्या भाषेत सांगायचे म्हणजे बावळट माणसे संघटनेत राहिली!

२६) **संजय माळी, मालेगाव (नाशिक)** : स्वतंत्र भारत पक्षाचा जाहीरनामा कितीही चांगला असला तरी स्वतः समजून घ्यायला व नंतर लोकांना समजावून द्यायला कार्यकर्ते कमी पडले. त्याच बरोबर, जाहिरनामा थोडा सौम्य व इतरांना सामावून घेणारा हवा होता.

२७) **प्रकाश पोहरे, संपादक, दै. दशोन्नती, अकोला (विदर्भ)** : माझ्या मते मतदारांनी 'स्वतंत्र भारत' पक्षाचे विरोधात मत दिलेले नाही. लोकांनी या वेळेला काँग्रेस नको या भूमिकेतून मतदान केले. परंतु त्याच वेळेला काँग्रेसला समर्थपणे तोंड देऊ शकेल असा राजकीय पक्ष 'स्वतंत्र भारत' आहे असे लोकांना पटवून देण्यात आपले कार्यकर्ते कमी पडले, यालाही काही कारणे आहेत.

यातील सगळ्यात महत्त्वाचे कारण म्हणजे एकाही वर्तमान पत्राने स्वतंत्र भारत पक्षाची दखलसुद्धा घेतली नाही. त्यामुळे हा पक्ष फारच कमकुवत आहे असा लोकांचा समज झाला. उलट "गेली गर्दी कुणीकडे" आणि "त्रिशंकू अवस्थेत, काँग्रेसला पाठींबा" अशाप्रकारे अपप्रचार झाला. दुसरी गोष्ट अशी की, बाकीच्या राजकीय पक्षांप्रमाणे आपण गावोगावी शाखा स्थापन करून पक्षांची बांधणी, वेळ कमी पडल्यामुळे करू शकलो नाही. अनेक गावात आपले कार्यकर्तेच नसल्यामुळे गावात कुणाकडे जायचे हा प्रश्न अनेकांना पडला. त्यामुळे या पक्षाला मत दिल्यास आपले मत वाया जाईल व पुन्हा काँग्रेसच सत्तेवर येईल अशा भीतीपोटी लोकांनी शिवसेना - भा.ज.प. युतीला मतदान केले. ●

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 6th June, 1995

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
June 6, 1995

**To**

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

## ३/४ जून १९९५ च्या बैठकीत शेतकरी संघटना भरारी घेणार?

३/४ जून १९९५ रोजी आंबेठाण येथे होणाऱ्या शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या विस्तारित कार्यकारिणी बैठकीत सविस्तर सांगोपांग चर्चा होऊन शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीचा पुढील कार्यक्रम आखला जाणार आहे.

हा अंक ६ जूनचा असला तरी पोस्टाच्या नियमांमुळे तो ४ जूनच्या आधीच तयार करावा लागला आहे. त्यामुळे वरील बैठकीचा वृत्तांत या अंकात देता येत नाही. बैठकीचा सविस्तर वृत्तांत २१ जून १९९५ च्या अंकात देण्यात येईल. **- संपादक**

## यवतमाळ येथे शिवार सुपर मार्केट

'शिवार ॲग्रो प्रॉडक्टस् लिमिटेड, नागपूर' ने प्राधिकृत केलेले 'शिवार सुपर मार्केट' यवतमाळ येथे दीड महिन्यापूर्वी सुरू झाले. शहरातील नागरिक येथून मोठ्या प्रमाणात खरेदी करीत आहेत. दैनंदिन वापराच्या वस्तूंखेरीज महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात तयार होणाऱ्या विविध वस्तू प्रमाणित करून या 'सुपर मार्केट' मधून ग्राहकांना उपलब्ध केल्या जाणार आहे.

२ ते ५ जून या काळात या सुपर मार्केट मध्ये महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील महिलांनी बनविलेल्या घरगुती खाद्यपदार्थ व इतर हस्तकलावस्तूंचे प्रदर्शन आयोजित केले आहे.

## विटनेर (जोतिबा गाव)
### ग्राम पंचायत बिनविरोध

विटनेर गावाने आपला आदर्श कायम ठेवून ग्रा. पं. त वर शेतकरी संघटनेचा झेंडा पुन्हा मजबूत केला.

सगळीकडे सुरू असलेल्या ग्रा. पं. निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याच्या वादळी वातावरणात विटनेर ग्रा. पं. ची निवडणूक ही जातीयवादाला थारा न देता बिनविरोध करण्यात आली. नऊ पैकी नऊ जागा शेतकरी संघटनेच्या आहेत.

ग्रा. पं. निवडणुकीची चाहूल लागण्यापूर्वीच काही विघ्नसंतुष्ट लोकांकडून गावात जातीयवादाला खतपाणी देवून गुर्जर व कोळी असा रंग चढविण्यात येत होता. परंतु शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी तो विचार हाणून पाडला व ग्रा. पं. बिनविरोध करण्यात संघटनेच्या कार्यकर्त्यांना यश आले.

मागच्या पंचवार्षिक निवडणुकीतसुद्धा विटनेर गावातील लोकांनी १००% महिला निवडून देऊन एक नवा आदर्श जनतेसमोर ठेवला होता. त्याही वेळी गुर्जर-कोळी जातीयवाद वर डोके काढत असतांना संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सौ. सुभाबाई कोळी यांना सरपंच करून संघटनेच्या विचारांना विजय मिळवला. मागची परिस्थिती पुन्हा निर्माण होता कामा नये व जातीय शक्ती कमी व्हावी म्हणून यावेळी देखील सरपंचासाठी श्री. कांतीलाल रामचंद्र कोळी यांचे नाव घोषित करून बाकी सर्व समाजाला प्राधान्य देवून ग्रा. पं. बिनविरोध करण्यात यश आले.

विटनेर गावाने संघटनेचा विचार अधिक मजबूत करून आपला आदर्श जनतेसमोर कायम ठेवला व तो ठेवण्यात खालील जेष्ठ कार्यकर्त्यांनी स्वतः परिश्रम घेतले व पंचायत पुन्हा एकदा आदर्श ठरविली.

श्री. नवल हरी पाटील, श्री. पुंडलिक खंडू कोळी, श्री. मनोहर भावलाल पाटील, श्री. कालिदास आनंदा पाटील.

प्रेषक : सौ. इंदिराताई पाटील, चोपडा.

## शरद जोशींची तब्येत

नियमित औषधोपचार, पथ्यपाणी व डॉक्टरी सल्ल्यानुसार व्यायाम यांच्या योगाने श्री. शरद जोशींच्या तब्येतीत चांगली सुधारणा होत आहे. तरीही अजून दोन महिने या सर्व औषधोपचारासह विश्रांती घेण्याची जरूरी आहे.

३/४ जून १९९५ च्या शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या विस्तारित कार्यकारिणीच्या बैठकीत मर्यादित भाग घेण्यापुरती सूट या विश्रांतीतून त्यांना डॉक्टरांनी दिली आहे.

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी. - ०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक — मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**